# मफुकृवि ई वार्ता

सप्टेंबर २०२१


महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

वर्ष :१, अंक क्रं. : ९, सप्टेंबर, २०२१

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या दोन वाणांचे मा. पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण
## पंतप्रधानांच्या हस्ते ३५ पीक वाणांचा लोकार्पण कार्यक्रम संपन्न





सीएसएच ४७



पीडब्लूबी ११–२

**दि. २८ सप्टेंबर, २०२१.** पर्यावरणीय अनुकुलता कृषि विकासाकरीता मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचे हस्ते देशभरात संशोधीत केलेल्या ३५ पीक वाणांचा राष्ट्रीय स्तरावर लोकार्पण कार्यक्रम पार पडला. सदरचा कार्यक्रम महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र तसेच कृषि विद्यापीठांतर्गत १० जिल्ह्यांमध्ये कार्यरत असणारे विविध महाविद्यालये, कृषि विज्ञान केंद्रे, संशोधन केंद्र या ठिकाणी आयोजीत करण्यात आला होता. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील हे नवी दिल्ली येथे झालेल्या कार्यक्रमात तर संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख हे कृषि विज्ञान केंद्र, धुळे या ठिकाणी झालेल्या कार्यक्रमासाठी उपस्थित होते तर राहुरी कृषि विद्यापीठात झालेल्या कार्यक्रमासाठी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ उपस्थित होते. मा. पंतप्रधानांनी लोकार्पण केलेले ३५ पीक वाण हे ताण सहनशील, जास्त उत्पन्न देणारे तसेच आरोग्यास पोषक असणाऱ्या अशा विविध पिकांच्या वाणांचा समावेश यात आहे. विशेष महत्वाचे म्हणजे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीने प्रसारीत केलेल्या ज्वारी पिकाच्या सीएसएच ४७ आणि फुले चारधारी वाल पीडब्लूबी ११–२ या दोन वाणांचा समावेश होता. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील अधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

## साखर उद्योगात फुले २६५ वाणाचे समज आणि गैरसमज



**दि. ९ सप्टेंबर, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीच्या पाडेगाव येथील ऊस संशोधन केंद्रा मार्फत कोएम ०२६५ (फुले २६५) हा ऊसाचा वाण महाराष्ट्रात सन २००७ मध्ये आडसाली, पूर्वहंगाम आणि सुरू या तिनही हंगामात लागवडीसाठी शिफारस करण्यात आला. त्यानंतर सन २००९ मध्ये हा वाण गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र आणि तामिळनाडू या राज्यात अखिल भारतीय ऊस संशोधन संस्था, लखनऊ यांनी शिफारशीत केला. हा वाण को ८७०४४ या वाणापासून निवड पध्दतीने तयार करण्यात आला.

सुरुवातीला फुले २६५ या वाणाला बऱ्याच साखर कारखान्यांनी गाळपासाठी नकार दिला होता. त्यावेळी कारखान्यांचे म्हणणे असे होते की या फुले २६५ वाणाचा साखर उतारा फार कमी आहे. परंतु, महात्मा फुले कृषि विद्यापीठाने संशोधनांती दाखवून दिले की फुले २६५ या वाणाचा तीनही हंगामात सरासरी साखर उतारा १४.४० टक्के, तर तुल्य वाण को ८६०३२ मध्ये साखरेचे प्रमाण १४.४७ मिळाले. फुले २६५ हा वाण मध्यम ते उशिरा पक्व होणारा असून थंडीचा कालावधी मिळाल्यावर डिसेंबर/जानेवारीनंतर हा वाण तोडणीस योग्य असतो. सुरु ऊस १२ महिन्यांनी, पूर्व हंगामी ऊस १४ महिन्यांनी आणि आडसाली ऊस १६ महिन्यांनी तोडणी केल्यास फुले २६५ या वाणापासून साखर उतारा चांगला मिळतो. साखर कारखान्यांनी ऊस तोडणीचे नियोजन करतांना लवकर पक्व होणारे वाणांची तोडणी डिसेंबरपर्यंत करावी आणि फुले २६५ या वाणाची तोडणी जानेवारीनंतर केल्यास साखर उतारा चांगला मिळेल. हा वाण शेतकऱ्यांच्या पसंतीस पडला आहे. या वाणाचे खोडव्याची फुट व वाढ चांगली असल्याने एकंदर उत्पन्नही चांगले मिळते. जवळपास १३ खोडवे शेतकऱ्यांनी घेतल्याचे उदाहरणे आहेत. चाबूककाणी, मर व लालकुज या रोगांना प्रतिकारक आहे. खोड किड, कांडी किड, शेंडेकिड व लोकरी मावा या किडींचा कमी प्रमाणात प्रादुर्भाव होतो.

महाराष्ट्र राज्याच्या साखर आयुक्तालयाने सर्व सहकारी आणि खाजगी साखर कारखान्यांना नुकतेच पत्राद्वारे सुचीत केले आहे की फुले २६५ या ऊस वाणाच्या लागवडीस शासनाची परवानगी असून या वाणाचा ऊस लागवडीस व गाळपास योग्य असल्याचे प्रमाणित झाले आहे. म्हणून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या फुले २६५ या ऊस वाणाची नोंद कारखान्यांनी घेण्यात यावी. पुढे त्यांनी म्हटले आहे की जी साखर कारखाने फुले २६५ वाणाच्या ऊस लागवडीची नोंद घेणार नाहित त्या कारखान्यांचा गाळप परवाना नाकारण्यात येईल आणि शेतकऱ्यांच्या अशा तक्रारी पुन्हा प्राप्त होणार नाही याची दक्षता घेण्याचे त्यांना सुचीत केले आहे.

ऊस उत्पादनातील ही किमया फुले २६५ मुळेच शक्य झाली. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील कृषि अर्थशास्त्र विभागाने या वाणाच्या प्रभावाचा अभ्यास केला. त्यामध्ये असे आढळून आले की, सन २००९-१० ते २०१६-१७ या ९ वर्षात शेतकरी आणि साखर कारखानदार यांना रू.३१६८१/- कोटी इतका आर्थिक फायदा झालेला आहे.

**- कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील**

फुले २६५ वाणाचा साखर उतारा तीनही हंगामात चांगला आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये फुले २६५ वाणाखाली सातत्याने क्षेत्र वाढत असून ३२ टक्के क्षेत्रावर याची लागवड केली जात आहे. फुले २६५ या वाणाने शेतकऱ्यांमध्ये सुबकता आणली आहे. या वाणाची महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीने शिफारस केली आहे.

**- संचालक संशोधन डॉ. शरद गडाख**

फुले २६५ वाण हा क्षारपड जमिनीसाठी उपयुक्त आहे. महाराष्ट्रात ऊस लागवड क्षेत्रापैकी १.५० लाख हेक्टर क्षेत्र हे क्षारपड असून त्या ठिकाणी आडसाली लागवडीसाठी फुले २६५ ला पर्याय नाही.

**- ऊस विशेषज्ञ डॉ. भरत रासकर**

श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., शिरोळ या साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात सन २०२०–२१ मध्ये फुले २६५ या वाणाखाली ४० टक्के क्षेत्र होते त्यापासून सरासरी साखर उतारा १२.५४ टक्के मिळाला आहे. श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि., सोमेश्वरनगर, ता. बारामती, जि.पुणे या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात सन २००८–२००९ पासून फुले २६५ वाणाची लागवड केली जाते. या वाणाची लागवड आणि साखरेच्या उताऱ्याचे सन २०१७–१८ ते २०२१–२२ या अलीकडच्या ५ वर्षाचे अवलोकन केले असता या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात फुले २६५ या वाणाखाली ७० टक्क्यापेक्षा जास्त क्षेत्र असतानाही साखर उतारा १२ टक्क्यापेक्षा अधिक मिळाला आहे.

चालू वर्षी राज्याची सरासरी ऊस उत्पादन हेक्टरी ९६ टन मिळाल्याचे साखर आयुक्तांकडील उपलब्ध आकडेवारी वरून दिसून येते. या वाणाने नैराशाने ग्रासलेल्या शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती केली आणि खऱ्या अर्थाने शेतकरी सधन आणि संपन्न झाला, कर्जबाजारीतून मुक्त झाला. काही शेतकऱ्यांनी फुले २६५ ची किमया अशी नावे आपल्या ट्रक्टरला, जीपला आणि घराला दिल्याची अनेक उदाहरणे आहेत. अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यात उसाच्या फुले २६५ विक्रमी उत्पादनातून अनेक शेतकऱ्यांनी महेंद्र कंपनीच्या बोलेरो गाड्या खरेदी केल्या आहेत. यावरुन राज्याच्या विकासात विशेषतः ऊस पिकामध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठ आणि पाडेगाव ऊस संशोधन केंद्राचे योगदान दिसून येते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या ज्वारी वाणांनी केली राज्यात उत्पादनाची क्रांती



**दि. २ सप्टेंबर, २०२१.** नगदी पिकांबरोबरच तृणधान्य पिकांचा कृषि उत्पन्नामध्ये मोठा वाटा आहे. तृणधान्य पिके हे अवर्षणप्रवण भागातील शेतकऱ्यांसाठी शाश्वत उत्पादनाचे स्त्रोत आहेत. तृणधान्य पिकांचे आहारामध्ये अनन्यसाधारण महत्व आहे. या तृणधान्य पिकांमध्ये ज्वारी हे महत्वाचे पीक आहे. ज्वारी प्रामुख्याने लो कॅलरीज म्हणून खाद्य पदार्थात वापरतात. ज्वारीमध्ये भरपूर तंतूमय घटक, स्टार्च, फायटोकेमिकल्स आणि न्यूट्रास्फुटिक्लस इ. गुणकारी घटक असतात.
महाराष्ट्रात रब्बी ज्वारी खाली सन २०२०–२१ मध्ये १६.६ लाख हेक्टर क्षेत्रावर लागवड होती. त्यामध्ये २३ टक्के क्षेत्र हे हलक्या जमिनीचे, ४८ टक्के मध्यम जमिनीचे तर २९ टक्के क्षेत्र हे भारी जमिनीचे आहे. यामधून मागील वर्षी राज्याला १७.४ लाख टन ज्वारीचे उत्पादन मिळाले. राज्यामधील एकुण ज्वारीच्या क्षेत्रापैकी २५ टक्के क्षेत्र महात्मा फुले कृषि

विद्यापीठाच्या विकसीत वाणांखाली आहे. यामध्ये फुले रेवती खाली १०%, फुले वसुधा खाली ९% आणि इतर वाणांखाली सहा टक्के आहे. सन २०११-१२ पासून म्हणजेच मागील १० वर्षाचा विचार करता राज्याची ज्वारी उत्पादकता ९१ टक्क्याने वाढली आहे, ज्वारी उत्पादन ३१ टक्क्याने वाढले असून रब्बी ज्वारीखालील क्षेत्र ४३ टक्क्यांनी कमी झाले आहे. म्हणजेच ज्वारीचे क्षेत्र कमी होवून देखील उत्पादन वाढले आहे. ज्वारीचे उत्पादन वाढण्यामध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या रब्बी ज्वारी वाणांचा व पंचसूत्री तंत्रज्ञानाचा मोठा वाटा आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने रब्बी ज्वारीसाठी जमिनीच्या प्रकारानुसार वाणांचे संशोधन केलेले आहे. त्यामध्ये हलक्या जमिनीसाठी फुले अनुराधा, फुले माऊली, मध्यम जमिनीसाठी फुले सुचित्रा तर भारी जमिनीसाठी फुले वसुधा, बागायतीसाठी फुले रेवती तर ज्वारीच्या इतर उपयोगांसाठी म्हणजेच हुरडयासाठी फुले मधुर, लाहयांसाठी फुले पंचमी व पापड बनविण्यासाठी फुले रोहिणी या वाणांचे संशोधन केले आहे.

महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विसकीत केलेले रब्बी ज्वारीचे वाण आणि विद्यापीठाने शिफारस केलेल्या पंचसूत्री तंत्रज्ञानाचा वापर केला तर शेतकऱ्यांना रब्बी ज्वारीत विक्रमी उत्पादनात घेता येईल. याचे उदाहरण म्हणजे सातारा येथील सोनगाव सारख्या दुर्गम भागातील प्रगतशील शेतकरी श्री. साहेबराव मन्याबा चिकणे यांनी फुले रेवती या रब्बी ज्वारीच्या वाणाचे हेक्टरी १०१ क्विंटल इतके उच्चांकी उत्पादन घेऊन राज्यात रब्बी ज्वारी पीक स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला तसेच वाई तालुक्यातील वरखडवाडी येथील युवा शेतकरी श्री. नितीन बाजीराव वरखडे यांनी ज्वारीचे हेक्टरी ९० क्विंटल उत्पादन घेवून राज्यात तृतीय क्रमांक मिळविला. फुले रेवती हा वाण बागायती क्षेत्रामध्ये खतांना चांगला प्रतिसाद देतो. ज्वारी वर येणाऱ्या खोड्माशी व खडखडया यासारख्या किड व रोगांना प्रतिकारक्षम वाण आहे. फुले रेवती वाणाच्या भाकरी व कडब्याची चव पारंपारीक मालदांडी सारख्या वाणाप्रमाणेच असल्यामुळे हा वाण शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय झालेला आहे.



महात्मा फुले कृषि विद्यापीठाद्वारे रब्बी ज्वारीचे विविध वाणांचे मुलभुत, पायाभुत बियाण्यांची निर्मिती केली जाते. हे मुलभुत बियाणे पुढे महाबीजला दिले जाते. या मुलभुत बियाण्यांपासून महाबीज पायाभुत, सत्यप्रत आणि प्रमाणीत बियाण्यांची निर्मिती करुन शेतकऱ्यांना देते. विद्यापीठाने जमिनीच्या प्रकारानुसार ज्वारीचे वाण विकसीत केलेले आहे. शेतकऱ्यांनी जमिनीच्या प्रकारानुसार वाणांची निवड करावी व पंचसूत्रीचा वापर करुन भरघोस उत्पादन घ्यावे.

**- कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील**



महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या ज्वारीच्या वाणांमुळे आणि उत्पादन तंत्रज्ञानामुळे राज्याची ज्वारीची उत्पादकता दुपटीवरुन अधिक वाढली आहे. सन २०११-१२ मध्ये राज्याची ज्वारीची उत्पादकता हेक्टर ५.५ क्विंटल होती. सन २०२०-२१ मध्ये राज्याची ज्वारीची उत्पादकता हेक्टरी १०.५ क्विंटल झाली आहे. ही उत्पादकता विद्यापीठाने विकसीत ज्वारीचे वाण फुले रेवती, फुले सुचीत्रा, फुले वसुधा, फुले अनुराधा आणि पंचसूत्री तंत्रज्ञानामुळे वाढलेली आहे.

**- संचालक संशोधन डॉ. शरद गडाख**

मफुकृवि ई वार्ता
सप्टेंबर २०२१
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : ९, सप्टेंबर, २०२१

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे घेवडा पिकाच्या वरुण व फुले राजमा या वाणांना शेतकऱ्यांची पसंती




**दिनांक १ सप्टेंबर, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातंर्गत विभागीय कृषि संशोधन केंद्र, गणेशखिंड, पुणे येथून विकसीत केलेले घेवडयाचे 'वरुण' आणि 'फुले राजमा' हे कडधान्य पिकाचे वाण शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरत आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये खरीप आणि रब्बी या दोन्ही हंगामात सातारा, पुणे, सांगली आणि कोल्हापूर या जिल्हयांमध्ये या पिकाखाली ५०,००० हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आहे. कमी कालावधीत अधिक उत्पादनक्षमता असणाऱ्या या वाणांचे सातारा जिल्हयातील कडधान्य पिकांतर्गत क्षेत्र ३०,००० हेक्टर असून पुणे, सांगली, कोल्हापूर आणि मराठवाडयातील बीड जिल्हयामध्ये या वाणांचे क्षेत्र वाढत आहे. या क्षेत्रापैकी ९० टक्के क्षेत्र महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या 'वरुण' व 'फुले राजमा' या वाणाखाली आहे. महाराष्ट्रामध्ये सुरुवातीला प्रचलीत 'वाघ्या' हा वाण मोठया प्रमाणात घेतला जात होता. परंतू या वाणापेक्षा अधिक उत्पादनक्षम आणि बाजारभाव मिळवून देणारा 'वरुण' हा वाण विभागीय कृषि संशोधन केंद्र, गणेशखिंड, पुणे येथून २००१ मध्ये प्रसारीत करण्यात आला आणि काही वर्षातच वाघ्या वाणाचे क्षेत्र वरुण वाणाने व्याप्त केले. वरुण हा कमी कालावधीत म्हणजे ७० ते ७५ दिवसात येणारा, मध्यम ते हलक्या जमिनीत कमी पाण्यावर अधिक उत्पादन देणारा वाण आहे. फिकट पांढऱ्या रंगाच्या दाण्यावर तपकिरी रंगाची छटा असणाऱ्या या वाणामध्ये प्रथीनाचे प्रमाण २३.३० टक्के व कर्बोदकाचे प्रमाण ६१.०० टक्के आहे. हा वाण खरीप आणि रब्बी दोन्ही हंगामात घेतला जात असल्याने लागवडीखालील क्षेत्र प्रकर्षाने वाढलेले दिसून येते.

'फुले राजमा' हा वरुण वाणापेक्षा अधिक उत्पादनक्षम असणारा वाण वाघ्या आणि जीआरबी–९७१० या वाणांच्या संकरातून २०१७ मध्ये प्रसारीत करण्यात आला. या वाणाचा कालावधी ८० ते ८२ दिवसाचा असून प्रथिनाचे प्रमाण २३.३८ टक्के व कार्बोदकाचे प्रमाण ६३.९३ टक्के इतके आहे. मर आणि विषाणूजन्य रोगास मध्यम प्रतिकारक्षम असणारा व फिक्कट पांढऱ्या रंगाच्या दाण्यावर आकर्षक गुलाबी रंगाची छटा असणाऱ्या या वाणास वरुण वाणापेक्षा चांगला बाजारभाव मिळत असल्यामुळे या वाणाखालील क्षेत्रसुध्दा वाढत आहे. महाराष्ट्रामध्ये कमी कालावधीत अधिक उत्पादनक्षमता असणाऱ्या या पिकाची सरासरी उत्पादकता ११ ते १२ क्विंटल प्रति हेक्टरी एवढी आहे. रब्बी हंगामात पिकाच्या संवेदनशील अवस्थेनुसार पाण्याच्या तीन पाळया दिल्यास उत्पादनामध्ये लक्षणीय वाढ होते. इतर पिकांच्या तुलनेत या पिकास रुपये ६,००० ते ७,००० प्रति क्विंटल दर मिळत असल्याने हे पीक शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरत आहे.

## रब्बी हंगामाच्या विभागीय बैठकीचे आयोजन






**दि. ९ सप्टेंबर, २०२१.** प्रत्येक पिकात जास्त उत्पादन देणारे वाण विकसीत करण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ प्रयत्नशील आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले पाहिजे हे आपल्या सर्वांचे उद्दिष्ट असून ते साध्य करण्यासाठी कृषि विद्यापीठ, महाराष्ट्र शासनाचा कृषि विभाग व महाबीज यांनी एकत्रीतपणे प्रयत्न करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व कृषि विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राहुरी येथे रब्बी हंगामासाठीची विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समिती बैठकीचे ऑनलाईन आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन कुलगुरु डॉ. पाटील बोलत होते. या प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे कृषि आयुक्त श्री. धीरज कुमार प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. यावेळी विद्यापीठाचे संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, संचालक, निविष्ठा व गुणनियंत्रण श्री. दिलीप झेंडे, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, कृषि परिषदेचे संचालक विस्तार शिक्षण डॉ. विठ्ठल शिर्के, महाबीज, अकोलाचे संचालक श्री. फुंडकर, श्री. आर.सी. जोशी उपस्थित होते.

कृषि आयुक्त श्री. धीरज कुमार म्हणाले शेतातील सर्व प्रकारची कामे एकाच यंत्राने करता येतील अशा प्रकारचे यंत्र तयार करण्यासाठी विद्यापीठाने संशोधन करावे जेणेकरुन लहान शेतकऱ्यांना त्याचा सर्वात मोठा फायदा होईल. विद्यापीठाने उन्हाळी भूईमुगाच्या बियाण्याची कमतरता दूर करावी अशी अपेक्षा त्यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केली. यावेळी झालेल्या तांत्रिक सत्रात डॉ. नंदकुमार कुटे, डॉ. सुरेश दोडके, डॉ. मधुकर भालेकर, डॉ. मिलिंद देशमुख आणि डॉ. विरेंद्र बारई यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. गडाख यांनी सन २०२० मधील प्रसारीत वाणांचे व शिफारशींचे सादरीकरण केले. याप्रसंगी कृषि विभागाचे संचालक श्री. विकास पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहयोगी संशोधन संचालक डॉ. राजेंद्र वाघ यांनी केले. यावेळी विभागीय कृषि सहसंचालक श्री. बसवराज बिराजदार (पुणे), श्री. उमेश पाटील (कोल्हापूर), श्री. संजीव पडवळ (नाशिक) उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. सचिन सदाफळ यांनी तर प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. पंडित खर्डे यांनी आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी कृषि विभागाचे अधिकारी, कृषि विद्यापीठातील सर्व सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख, सहयोगी संशोधन संचालक आणि शास्त्रज्ञ, अधिकारी मोठ्या संख्येने ऑनलाईन उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या क्षारपड जमीन सुधारणा तंत्रज्ञानामुळे शेकडो एकर जमीन क्षारमुक्त




**दि. २२ सप्टेंबर, २०२१.** भारतामध्ये इतर कोणत्याही राज्यांच्या तुलनेत भारी काळ्या जमिनीचे सर्वाधिक प्रमाण महाराष्ट्रामध्ये आहे. भारी काळ्या जमिनीची कमी निचरा क्षमता, भूपृष्टापासून कमी खोलीवर असणारे अभेद्य थर, पारंपारिक सिंचनाव्दारे पिकांसाठी पाण्याचा अमर्याद वापर, धरणे/तलाव/कॅनाल यांमधून होणारी पाण्याची गळती, पावसापेक्षा बाष्पीभवनाचे प्रमाण जास्त, विस्कटलेली नैसर्गिक निचरा पध्दत, पूरपरिस्थिती, योग्य त्या पीक फेरपालटीचा अभाव, सेंद्रिय पदार्थांचा कमी वापर, मचूळ पाण्याचा शेतीसाठी वापर इ. कारणांमुळे भारी काळया जमिनीमध्ये क्षारांचे व पाण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत जाऊन सुपीक जमिनी क्षारपड–पाणथळ होऊन नापिक होत आहेत. महाराष्ट्रामध्ये क्षारपड जमीनीचे क्षेत्र ६ लाख हेक्टर आहे. ही समस्या पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, कोल्हापूर, सातारा, सोलापुर, पुणे, अहमदनगर; मराठवाडयातील औरंगाबाद, परभणी, नांदेड आणि विदर्भामध्ये वर्धा, अमरावती, अकोला इ.जिल्हयामध्ये वाढताना दिसत आहे. या क्षारपडीच्या समस्येमुळे शेतकऱ्यांचे उसाचे उत्पादन हेक्टरी ५० ते ६० टन पर्यत कमी झालेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अशा जमिनीत पीक घेणे आर्थिकदृष्टया न परवडणारे आहे. या गंभीर समस्येवर उपाययोजना करण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि संशोधन केंद्र, कसबे डिग्रज, जि. सांगली हे केंद्र नेहमी प्रयत्नशील आहे. या समस्येवर विद्यापीठ शिफारशीत भारी काळया क्षारयुक्त–चोपण जमिनीची सुधारणा करणेसाठी सच्छिद्र पाईप भुमिगत निचरा प्रणाली (१.२५ मीटर खोली, २ पाईप मधील अंतर २५ मीटर) आणि जिप्सम आवश्यकतेनुसार (५० टक्के) व हिरवळीचे पीक धैंचा यांचा एकात्मिक वापर फायदेशीर असल्याचे आढळून आले आहे. या भुमिगत निचरा तंत्रज्ञानामुळे पिकांच्या वाढीसाठी योग्य असे जमिनीत वातावरण तयार होते. जमिनीचे तापमान पिकास योग्य असे राखले जाते. जमिनीच्या भुपृष्ठावर क्षार साठवण्याची क्रिया मंदावते व जमीन लागवडीस योग्य होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठाने क्षारपड जमीन सुधारण्यासाठी तयार केलेल्या भूमीगत सच्छिद्र पाईप निचरा तंत्रज्ञानामध्ये भूपृष्ठापासून १.० ते १.५ मीटर खोलीचे चर काढून त्यामध्ये सच्छिद्रनिचरा बांगडीपीव्हीसी पाईप उताराला आडवे टाकून त्या पाईपभोवती गाळण (फिल्टर) म्हणून ७.५ ते १० सेमी जाडीचा कराळा/चाळ वाळूचा थर किंवा पाईपभोवती सिंथेटीक फिल्टरचे आवरण वापरून हे पाईप जमिनीमध्ये विशिष्ट उतार देऊन गाडावेत. या पध्दतीत लॅटरल (सच्छिद्र पाईप), कलेक्टर (उपनळी) पाईप, सबमेन (उपमुख्य नळी) आणि मेन पाईप (मुख्य नळी) एकमेंकाना अशा पध्दतीने जोडल्या जातात की जेणेकरुन पिकांच्या मुळांच्या कक्षेतील क्षार व अतिरिक्त पाणी मातीतून पाझरुन प्रथम

वर्ष :१, अंक क्रं. : ९, सप्टेंबर, २०२१ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

लॅटरलमधून कलेक्टर पाईपकडे नेले जाते आणि कलेक्टर पाईपमधील पाणी उपमुख्य पाईपमधून मुख्य पाईपपर्यंत नेले जाते. त्यानंतर या मुख्य पाईपमधील पाणी शेवटी नैसर्गिक ओढा, नाला किंवा नदीमध्ये सोडले जाते.ज्या ठिकाणी नैसर्गिक उगमस्थान नसेल त्या ठिकाणी मुख्य नळीतून निचरा होणारे पाणी विहीर किंवा तलावामध्ये साठवून उपसा करुन शेताबाहेर काढले पाहिजे. या भूमिगत सच्छिद्र पाईप निचरा पध्दतीसाठी हेक्टरी १,२५,००० ते २,००,००० रुपये खर्च येतो.

हे तंत्रज्ञान कृषि संशोधन केंद्र, कसबे डिग्रजच्या ४० एकर प्रक्षेत्रावर राबविल्यानंतर ४ वर्षांनी जमिनीतील सामु : ८.४७ वरून ७.८५, क्षारता: १५.८० वरून ३.३१ आणि विनिमययुक्त सोडीयमचे प्रमाण: १५.३० वरुन ३.६५ इतके सुधारल्याचे दिसून आले. तसेच पडीक असणाऱ्या जमिनीमध्ये हे तंत्रज्ञान वापरल्यानंतर उसाची उत्पादकता १२५ टन/हेक्टर इतकी वाढ झाली. आतापर्यत शेतकऱ्यांच्या १००० एकर क्षेत्रावर भूमिगत निचरा प्रणाली या कृषि संशोधन केंद्राच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेली असून या शेतकऱ्यांना सुध्दा हा फायदा होत आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत, कृषि संशोधन केंद्र, कसबे डिग्रज मार्फत सांगली जिल्हयासाठी शेतकऱ्यांच्या १५० एकर शेतावर भूमिगत सच्छिद्र पाईप निचरा प्रणाली बसविण्यात आलेली आहे. या अंतर्गत सहभागी शेतकऱ्यांचे निचरा पध्दत बसविण्याआधीचे ऊस उत्पादन साधारणत: ७५ ते १२५ टन/हेक्टर (सरासरी १०० टन/हेक्टर) या दरम्यान निघत होते. भूमिगत सच्छिद्र पाईप निचरा पध्दत बसविल्यानंतर उसाचे उत्पादन १३२.५० ते १७२.५० टन/हेक्टर (सरासरी १५२.५० टन/हेक्टरी) इतके वाढलेले दिसून आले.त्यामुळे उसाच्या सरासरी उत्पादनात ५२.५० टन/हेक्टर वाढ झाल्याचे दिसून येते. या भूमिगत सच्छिद्र पाईप निचरा पध्दतीमुळे वाढलेल्या ऊस उत्पादनातून (रु २५००/- प्रति टन या दराने) रु. १,३१,२५०/- प्रति हेक्टर उत्पन्न वाढल्याचे दिसून येते. भूमिगत निचरा पध्दतीसाठी सरासरी रु.१,५०,०००/- प्रति हेक्टरी खर्च दोनच वर्षात भरून निघतो. तिसऱ्या वर्षापासून सरासरी रु. १,३१,२५०/- प्रति हेक्टरी उत्पन्न या पुढील काळात शेतकऱ्यांना कायम मिळत राहतो. त्यामुळे ही भूमिगत सच्छिद्र पाईप निचरा पध्दत शेतकऱ्यांना आर्थिकदृष्टया अतिशय फायदेशीर ठरलेली आहे.

कोल्हापूर जिल्हयातील शिरोळ तालुक्यामधील श्री दत्त सहकारी साखर कारखाना कार्यक्षेत्रामध्ये या तंत्रज्ञानाचा मोठया प्रमाणावर प्रसार करण्यामध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषि संशोधन केंद्र, कसबे डिग्रज, जि. सांगली येथील शास्त्रज्ञांनी प्रयत्न केले. या कारखान्याचे चेअरमन श्री. गणपतराव पाटील यांनी हे तंत्रज्ञान शिरोळ तालुक्यातील विविध गावांमध्ये शेतकऱ्यांना एकत्र करुन विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली राबविले आहे. साधारण ७००० एकर क्षारपड जमीन क्षेत्रावर याचे नियोजन असून यातील २००० एकर क्षेत्रावर काम पूर्ण झाले आहे. या प्रकल्पामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या क्षारपड जमिनीमध्ये एकाच वर्षानी सुधारणा होऊन सामु २.४४% आणि क्षारता ५८% नी कमी झालेली आहे. या तंत्रज्ञानाच्या वापरानंतर क्षारपडग्रस्त शेतकऱ्यांचे उसाचे उत्पादन सरासरी ६७ टन/हेक्टर वरुन १२७ टन/हेक्टर इतके वाढले आहे.



महाराष्ट्रातील क्षारपड जमिनी सुधारण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी शिफारशीत एकात्मिक क्षारपड जमीन सुधारणा तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांचे उसाचे उत्पादन २० ते २५ टन प्रति एकरावरुन ५० ते ५५ टन प्रति एकर पर्यंत वाढलेले आहे. या भुमिगत निचरा पध्दतीसाठी येणारा खर्च तीन ते चार वर्षात वसूल होतो. त्यासाठी कोणत्याही अनुदानाची वाट न पाहता शेतकऱ्यांनी एकत्रीत येवून सामुदायीक निचरा पध्दत राबवून क्षारपड जमिनींची सुधारणा करुन घ्यावी.

**- कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील**

मफुकृवि ई वार्ता
सप्टेंबर २०२१





भुमिगत सच्छिद्र पाईप निचरा तंत्रज्ञानामुळे क्षारपड जमिनीत झालेली सुधारणा आणि ऊस उत्पादन वाढीमुळे शेतकऱ्यांमध्ये अतिशय आनंदाचे वातावरण आहे. हे तंत्रज्ञान आर्थिक दृष्ट्या अतिशय फायदेशीर असल्याचे कृषि संशोधन केंद्र, कसबे डिग्रज येथील संशोधनावरुन सिध्द झालेले आहे. त्यामुळे  क्षारपडीने ग्रस्त असणाऱ्या शेतकऱ्यांनी निसंकोचपणे पुढे येवून या तंत्रज्ञानाचा अवलंब करावा.

**– संशोधन संचालक डॉ. शरद गडाख**

क्षारपड जमीन सुधारण्यासाठी आवश्यक असणारे भूमिगत निचरा तंत्रज्ञान, रासायनिक भुसुधारके तसेच हिरवळीच्या खतांचा एकत्रित वापरासंदर्भात कृषि संशोधन केंद्र, कसबे डिग्रज शिफारशीत तंत्रज्ञानामुळे सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील हजारो एकर क्षारपड जमीन सुधारुन शेतकऱ्यांचे आर्थिक आणि सामाजीक जीवनमान सुधारत आहे. त्यामुळे शेतकरी स्वखर्चाने हे तंत्रज्ञान राबविण्यासाठी स्वेच्छेने पुढे येत आहेत.

**– डॉ. दिलीप कठमाळे, प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, कसबे डिग्रज**

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ राबविणार कृषि पारायणाची नविन संकल्पना

**दि. २२ सप्टेंबर, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या संकल्पनेतून कृषि पारायण हि संकल्पना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील दहा जिल्ह्यात राबविली जाणार आहे. पश्चिम महाराष्ट्रातील दहा जिल्हे नंदूरबार, जळगाव, धुळे, नाशिक, अहमदनगर, पुणे, सोलापूर, सांगली, सातारा व कोल्हापूर हे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कार्यक्षेत्र आहे. या जिल्ह्यातील कृषि महाविद्यालये, संशोधन केंद्र, कृषि विज्ञान केंद्रे, विभागीय विस्तार केंद्रे, जिल्हा विस्तार केंद्रे यांच्या सहभागातून हा कृषि पारायण उपक्रम राबवला जाणार आहे. यामध्ये महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी, पशुसंवर्धन अधिकारी यांचा सुध्दा सहभाग घेणार आहे. राज्यात प्रथमच असा तंत्रज्ञान प्रसाराचा शेतकरीभिमूख उपक्रम राबविला जाणार असल्याचे कुलगुरु डॉ. पाटील यांनी सांगितले.

कृषि पारायणाद्वारे तंत्रज्ञान प्रसार हा उपक्रम नक्की आहे तरी काय? या कृषि पारायणामध्ये जिल्ह्यातील एक गाव निवडले जाणार. या गावात त्या जिल्ह्यातील कृषि महाविद्यालय, कृषि विज्ञान केंद्रे, संशोधन केंद्रे, विभागीय/जिल्हा विस्तार केंद्रातील शास्त्रज्ञांचा चमू भेट देणार आहे. त्या गावातील शेतकऱ्यांच्या पीक उत्पादनातील अडचणी जाणून घेणार. शास्त्रज्ञांचा चमू हा शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार. पण हे मार्गदर्शन नेहमीसारखे नसून एकात्मिक पध्दतीचे असणार आहे. यामध्ये त्या गावातील जमीन, हवामान कसे आहे, गावालगत एखादे मोठे शहर आहे का, त्या गावात कृषि प्रक्रिया उद्योग आहे का याचा अभ्यास करुन त्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. यामध्ये मातीचे आरोग्य कसे सुधारायचे, मातीतील कर्बाचे प्रमाण कसे वाढवायचे, पाण्याचा शेतीसाठी काटेकोर वापर कसा करायचा, पाणी व्यवस्थापनाद्वारे उत्पादन कसे वाढवायचे, सेंद्रिय शेती म्हणजे काय, सेंद्रिय शेती कशी करायची, सेंद्रिय शेतीमुळे होणारे फायदे, शेती उत्पादन खर्च कमी करण्यासाठी उपाय, स्मार्ट शेती, रासायनीक खतांचा समतोल वापर, जमीन आरोग्य पत्रिकेनुसार खतांचा वापर, रिमोट सेंन्सींग तंत्राचा शेतीमधील वापर, सूक्ष्म सिंचनाचे प्रकार, स्थानिक हवामानानुसार शेती सल्ला,फळबाग व्यवस्थापन, शेतीमध्ये आधुनिक तंत्राचा वापर, जनावरांसाठी वर्षभराचे चारा नियोजन, अधिक दुग्ध उत्पादनासाठी जनावरांचे व्यवस्थापन, मुक्त गोठा पध्दतीचे फायदे, देशी गोवंश व्यवस्थापन, मुरघास तंत्रज्ञान, शेळीपालन तंत्रज्ञान, पुर्वमशागतीचे अवजारे, शेतीचे यांत्रिकीकरण, कृषि माल प्रक्रिया, मुल्यवर्धन अशा विविध विषयांवर दिवसभर कृषि शास्त्रज्ञ शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतील

व त्यांच्याशी संवाद साधतील.

हा कृषि पारायण उपक्रम सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील थोर कवी कै. ग.दि. माडगुळकर यांचे जन्मगाव शेटफळे या गावातून सुरु करण्यात येणार आहे. या परिसरातील डाळिंब बागांवर मोठ्या प्रमाणात आलेल्या मर रोगासंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी दि.२१ सप्टेंबर, २०२१ रोजी डॉ. अनिल दुरगुडे, डॉ. अशोक वाळुंज, डॉ. देवेंद्र इंडी, डॉ. प्रकाश मोरे या विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांच्या चमूने मर रोगग्रस्त डाळिंब बागांना भेटी दिल्या, शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले, यानंतर त्या गावातील सभागृहामध्ये डाळिंब बागायतदार शेतकऱ्यांना डाळिंब बाग व्यवस्थानासंदर्भात मार्गदर्शन केले. या कृषि पारायणाच्या संकल्पनेची गरज विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांना भेट दिल्यानंतर जाणविली. कृषि पारायण हा उपक्रम सांगितल्यानंतर शेतकऱ्यांनी याचे स्वागत केले.



राज्यातच नव्हे तर देशात कृषि पारायण हा शेतकरीभिमूख तंत्रज्ञान प्रसाराचा कार्यक्रम प्रथमच आम्ही राबविणार आहोत. यासाठी जिल्हानिहाय शास्त्रज्ञांचा चमू बनवून हा प्रत्येक हंगामातील एक दिवस एक गाव प्रति जिल्हा तंत्रज्ञान प्रसारासाठी घेणार आहे. अशा उपक्रमामुळे शेतकऱ्यांना शेती करण्याचे शास्त्रीय ज्ञान मिळेल व त्यांच्या उत्पन्नात वृध्दी होईल.

**– कुलगुरु डॉ. पी.जी पाटील**

## कास्ट–कासम प्रकल्पाचा ऑनलाईन वेबिनार संपन्न




**दि. १३ सप्टेंबर, २०२१.** विद्यार्थी, शास्त्रज्ञ व शेतकऱ्यांना हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापन या विषयी जागरुकता निर्माण व्हावी व तंत्रज्ञानांचा अवलंब झपाट्याने व्हावा याकरिता विविध प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात येत आहेत. नैसर्गिक संसाधनांचे जतन, पिकांचे अचूक व्यवस्थापन, उत्पादनखर्चात बचत करून उत्पादनात वाढीसह कृषिचा शाश्वत विकास करून शेतकऱ्यांना स्वावलंबी बनविण्यात स्वयंचलीत तंत्रज्ञान महत्वाची भूमिका बजावेल असे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांनी सांगितले. जागतिक बँक अर्थसहाय्यीत, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थान, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व भारतीय कृषि इंजिनिअर संस्था, नवी दिल्ली यांच्या संयुक्तपणे आयोजित ३.९ कृषिमधील

स्वयंचलन या विषयी वेबिनारचे ऑनलाईन आयोजन करण्यात आले होते. या वेबिनारचा विषय संशोधन व शिक्षणातील भावी दृष्टीकोन हा होता. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. पाटील बोलत होते. या वेळी नवी दिल्ली येथील भारतीय कृषि इंजिनियर संस्थेचे प्रमुख डॉ. गजेंद्र सिंग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोल्याचे माजी कुलगुरू डॉ. व्ही.एम. मायंदे, मुंबई येथील सिफाचे संचालक डॉ. सय्यद इस्माईल, कास्ट प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार, सहप्रकल्प समन्वयक डॉ. मुकुंद शिंदे, सदस्य डॉ. सचिन नलावडे, प्रगतशील शेतकरी श्री.राहुल रसाळ, डॉ. रविंद्र निकम, श्री. संदीप घोले उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. गजेंद्र सिंग म्हणाले शेतकऱ्यांनी शाश्वत तंत्रज्ञानाचा अवलंब करावा व शेतकऱ्यांनी स्वतःच्या शेतीमध्ये नवनविन प्रयोग करावे आणि शेतीकडे उद्योग म्हणुन बघावे. या वेळी डॉ. गोरंटीवार यांनी जल व्यवस्थापनाचे आधुनिक तंत्रज्ञान या विषयी मार्गदर्शन केले. डॉ. शिंदे यांनी कास्ट–कासम प्रकल्पांतर्गत हवामान स्मार्ट गावे या संदर्भात माहिती दिली. डॉ. नलावडे यांनी कास्ट–कासम प्रकल्पाद्वारे संशोधीत शेती करिता ड्रोन व यंत्रमानव वापर विषयी माहिती दिली. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. सय्यद इस्माईल यांनी मानले.

## कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांची शेतकरी प्रथम प्रकल्पाच्या गावांना भेटी







**दि. १६ सप्टेंबर, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या एकात्मिक शेती पध्दतीमुळे शेतकऱ्यांना शाश्वत उत्पादन व उत्पन्न मिळतेच पण या व्यतिरिक्त त्यांना सकस अहारही मिळतो. तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ आणि कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त  विद्यमाने भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचा शेतकरी प्रथम कार्यक्रमाच्या खरीप पीक प्रात्यक्षिक भेट व शेतकऱ्यांबरोबर सुसंवाद या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन कुलगुरु

डॉ. पी.जी. पाटील बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन पुणे येथील भा.कृ.अ.प.–कृषि तंत्रज्ञान व संशोधन संस्थेचे संचालक डॉ. लाखन सिंग उपस्थित होते. यावेळी व्यसपीठावर शेतकरी प्रथम प्रकल्पाचे प्रमुख समन्वय डॉ. पंडित खर्डे, तालुका कृषि अधिकारी श्री. महेंद्र ठोकळे, तांभेरेचे सरपंच श्री. नितीन गागरे, मेजर ताराचंद गागरे उपस्थित होते.

कुलगुरु डॉ. पाटील पुढे म्हणाले की पारंपारिक शेतीला दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन या व्यवसायांची जोड देऊन शेतकरी एकात्मिक शेती पध्दतीद्वारे शाश्वत उत्पन्न मिळवू शकतो. यावेळी प्रमुख मार्गदर्शन करतांना संचालक डॉ. लाखन सिंग म्हणाले शेतकऱ्यांनी शेती करतांना तंत्रज्ञानाची साथ घ्यावी व शास्त्रीयदृष्ट्या शेती करावी. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे यांनी केले. याप्रसंगी तालुका कृषि अधिकारी श्री. महेंद्र ठोकळे यांनी कृषि विभागाच्या विविध योजनांनबद्दल शेतकऱ्यांना माहिती दिली. याप्रसंगी प्रगतशील शेतकरी ताराचंद गागरे, मारुती गिते, प्रविण गाडे यांनी भा.कृ.अ.प. शेतकरी प्रथम कार्यक्रमामुळे त्यांच्या शेतीत झालेले फायदे याबद्दल मनोगत व्यक्त केले. यावेळी कुलगुरुंच्या हस्ते शेतकऱ्यांना रब्बी ज्वारीचे बियाणे वितरीत करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी भा.कृ.अ.प. शेतकरी प्रथम कार्यक्रमांतर्गत घेतलेल्या विविध खरीप पीक प्रात्यक्षिकांना भेट दिली. यामध्ये चिंचविहिरे येथील दालमिल युनिट, चिंचविहिरे येथील सौ. सविता नालकर यांच्या एकात्मिक शेती पध्दतीला भेट, श्री. मच्छिंद्र शेटे यांच्या डाळिंब बाग व शेततळ्यास भेट, कणगर येथील श्री. राजेंद्र वरघुडे व श्री. प्रविण गाडे यांच्या एकात्मिक शेती पध्दतीला भेट व तांभेरे येथील श्री. ताराचंद गागरे यांच्या सोयाबीन पीक प्रात्यक्षिकास भेट दिली. याप्रसंगी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ डॉ. संजय मंडकमाले, डॉ. उल्हास सुर्वे, डॉ. अनिल दुरगुडे, राहुरी मंडल कृषि अधिकारी श्री. जयंत जाधव, प्रगतशील शेतकरी श्री. भास्कर वरघुडे उपस्थित होते. या कार्यक्रमास तांभेरे, चिंचविहिरे, कानडगाव आणि कणगरचे शेतकरी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सचिन सदाफळ यांनी केले तर आभार श्री. विजय शेडगे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. राहुल कोऱ्हाळे आणि श्री. किरण मगर यांनी परिश्रम घेतले.

## शेतकऱ्यांचा कृषि माल निर्यातीसाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ प्रयत्नशील

**दि. १४ सप्टेंबर, २०२१.** सध्या महाराष्ट्रामध्ये परदेशातुन शोभीवंत झाडांची रोपे तसेच द्राक्षांसारखी कलमे आयात केली जातात. परदेशातून येणाऱ्या रोपांबरोबर काही परदेशी रोग किंवा किडी भारतात येवू नयेत म्हणून अशी रोपे रोग व किडमुक्त असल्याचे संबंधीत निर्यातदाराने प्रमाणीत करणे बंधनकारक असते. असे असले तरी ज्या ज्या वेळी परदेशातून रोपे/झाडे आयात केली जातात त्या त्या वेळी केंद्र शासनाच्या विभागीय रोप विलगिकरण संस्था समुद्रकिनारी व विमानतळावर कार्यरत असतात. या ठिकाणी आयात केलेली रोपे जरी तपासली तरी ही रोपे पुन्हा ठराविक कालावधीसाठी विभागीय रोप विलगिकरण संस्था यांचे देखरेखीखाली ठेवले जातात. त्यासाठी केंद्रशासनाकडून देशभरातील कृषि विद्यापीठाचे रोगशास्त्र विभागास जबाबदारी दिली आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत नाशिक आणि पुणे विभागात येणाऱ्या रोपांच्या सुविधा व विलगिकरण कालावधीमधील देखरेखीचे जबाबदारी दिली आहे. याबरोबरच आता पश्चिम महाराष्ट्रातील निर्यातक्षम पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांचा माल निर्यातयोग्य प्रमाणीत करण्यासाठी लागणाऱ्या आरोग्यविषयक (फायटोसॅनिटरी) प्रमाणीकरण प्रक्रियेत सहभाग वाढवून शेतकऱ्यांना तत्पर सेवा देवून त्यांचा वेळ, श्रम वाचविण्यासाठी पुढाकार घेणार आहे. तसा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात येत आहे असे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी सांगितले.

राज्यातील कृषि मालाची निर्यात वाढविण्यासाठी राहुरीचे महात्मा फुले कृषि विद्यापीठ यंदा विशेष प्रयत्न करीत आहे. निर्यातक्षम फळबागा व इतर पिके यांचे निर्यात नोंदणीसाठी विशेष प्रयत्न सुरु केले आहेत. या निर्यातीसाठी आवश्यक असणारी वनस्पती आरोग्यविषयक (फायटोसॅनिटरी) प्रमाणपत्र सध्या जिल्ह्याच्या कृषि अधिक्षक कार्यालयामार्फत

वितरीत केली जातात. फलोत्पादन व इतर पिके यांच्या निर्यातीला चालना देण्यासाठी राज्याचा फलोत्पादन विभाग व अपेडा यांचे धोरणात्मक निर्णय उपयुक्त ठरत असतात. निर्यातक्षम शेतीमालाची नोंदणी करण्यासाठी कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांनी हॉट नेट ही संगणकीय प्रणाली उपलब्ध करुन दिली आहे. त्यात शेतमाल निर्यातीसाठी नोंदणी करावी लागते. राज्याच्या कृषि विभागाने आता या हॉट नेट प्रणालीमध्ये पीक निहाय नोंदणीचा समावेश जसे आनारनेट, मँगोनेट, व्हेज नेट, सिट्रस नेट इ. समावेश केला आहे. विशेष म्हणजे या प्रणालीचा वापर करतांना सर्वसाधारण ग्रामीण भागातील शेतकरी तसेच कृषि विभागाचे कर्मचारी हे भ्रमणध्वनीच्या आधारे अद्ययावत माहिती भरत असतात. या निर्यात वाढीसाठी अपेडा, राज्य कृषि विभाग तसेच कृषि विद्यापीठे हे दूरदृष्य प्रणालीद्वारे प्रशिक्षणवर्ग ही घेत असतात.

निर्यातक्षम कृषि मालाची नोंदणी वाढविण्यासाठी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये विद्यापीठाने मोहिम राबविण्याचे ठरविले आहे. या निर्यात वाढीसाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील तसेच तंत्र अधिकाऱ्यांचे विद्यापीठ सहकार्य घेणार आहे असे डॉ. तानाजी नरुटे यांनी सांगितले तर शेतमाल निर्यातीसाठी क्षेत्र वाढविण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ विशेष प्रयत्न करणार आहे असे विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. शरद गडाख यांनी मनोदय व्यक्त केला.

## कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील शेतकऱ्याच्या बांधावर



**दि. २४ सप्टेंबर, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील निघोज येथील युवा उद्यान पंडीत श्री. राहुल रसाळ यांच्या प्रयोगशील शेतीस भेट देवून त्यांनी अवलंबलेल्या नाविन्यपूर्ण शास्त्रीय आधुनिक शेती पध्दती विषयी जाणून घेतले. यावेळी त्यांचे सोबत त्यांचे विशेष कार्याधिकारी डॉ. महानंद माने उपस्थित होते. यामध्ये बायोस्लरी सयंत्र ते शेतामध्ये पिकास देण्याची यंत्रणा, द्राक्षपिकात लावलेली भूमिगत सिंचन पध्दती, करटोली पिकाची द्राक्षामधील लागवड, कारली पिकाची लागवड, स्वयंचलित हवामान यंत्र आणि त्याद्वारे केले जाणारे पाणी आणि खत व्यवस्थापन, किटकनाशक आणि बुरशीनाशक फवारणीचे वेळापत्रक इ. बांबीची पाहणी केली. श्री. रसाळ यांची बांधावरची प्रयोगशाळा आणि त्यातील ट्रायकोडर्मा बुरशीचे उत्पादन याची माहिती कुलगुरुंनी घेतली. विद्यापीठात राबविण्यात येणाऱ्या कृषि पारायण या नाविन्यपूर्ण उपक्रमात सहभागी होण्याची विनंती श्री. रसाळ यांना कुलगुरुंनी केली तसेच श्री. रसाळ यांची विद्यापीठातील जलसिंचन आणि निचरा अभियांत्रिकी विभागाच्या अभ्यास

मंडळावर नेमणुक करत असल्याची बाब अवगत केली. श्री. रसाळ यांचे प्रगतशील शेतीचे प्रयोग विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यास प्रेरणादायी ठरतील असा आशावाद कुलगुरुंनी यावेळी व्यक्त केला. शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष भेट दिल्यामुळे कुलगुरु डॉ. पाटील यांचे शेतकरी, कर्मचारी आणि अधिकारी स्तरावरुन अभिनंदन केले जात आहे.

## कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील यांची राळेगणसिध्दीला भेट



**दि. २३ सप्टेंबर, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी आज राळेगणसिध्दी येथे भेट दिली. यावेळी त्यांनी जेष्ठ समाजसेवक पद्‌मभूषण आण्णासाहेब हजारे यांची सदिच्छा भेट घेतली. कुलगुरु डॉ. पाटील यांनी यावेळी विद्यापीठातर्फे पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व कृषिदर्शनी देवून आण्णांचा सत्कार केला. याप्रसंगी आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्‌मश्री पोपटराव पवार उपस्थित होते. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी आण्णांना गेल्या सहा महिन्यातील राबविण्यात आलेल्या विद्यापीठातील विविध उपक्रमांबद्दल माहिती देवून चर्चा केली. कुलगुरु डॉ. पाटील यांच्या कृषि पारायण या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल आण्णांनी त्यांचे कौतुक केले व अशा प्रकारच्या उपक्रमातुन शेती क्षेत्राला उर्जित अवस्था प्राप्त होईल असे प्रतिपादन करुन कुलगुरुंना भरीव कार्यासाठी व भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी राळेगणसिध्दी येथे उपस्थित असलेल्या पाणी फाउंडेशनच्या प्रशिक्षण चमू बरोबर कुलगुरु डॉ. पाटील यांनी वार्तालाप करुन महात्मा फुले कृषि विद्यापीठामार्फत राबविण्यात येणाऱ्या सिंचन व्यवस्थापन व पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाबद्दल तसेच प्रशिक्षण कार्यक्रमाविषयी सविस्तर चर्चा करुन यासंबंधीचा आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या. या भेटीप्रसंगी कुलगुरुंचे विशेष कार्याधिकारी डॉ. महानंद माने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाकडून सातारा जिल्हयातील शेतकऱ्यांचा सन्मान






**दिनांक : १५ सप्टेंबर, २०२१.** सन २०२० मधील राज्यस्तरीय रब्बी हंगाम ज्वारी पीक स्पर्धेत सातारा जिल्हयातील जावली तालुक्यातील दुर्गम भागातील प्रगतशिल शेतकरी श्री. साहेबराव चिकणे, रा. सोनगांव, ता. जावली यांनी ज्वारीच्या फुले रेवती वाणाचे हेक्टरी १०१ क्विंटल इतके उच्चांकी उत्पादन घेऊन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. त्याबरोबरच वाई तालुक्यातील वरखडवाडी येथील युवा शेतकरी श्री. नितीन वरखडे यांनी हेक्टरी ९० क्विंटल उत्पादन घेऊन राज्यात तृतीय क्रमांक मिळविला. या शेतकऱ्यांचा सन्मान व्हावा या उद्देशाने मौजे सोनगांव, ता. जावली येथे शेतकरी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. संचालक, विस्तार शिक्षण तथा संचालक संशोधन डॉ. शरद गडाख यांनी या पुरस्काराचे मानकरी दोन्ही शेतकऱ्यांचा विद्यापीठाच्या वतीने सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ विद्यापीठाचे प्रकाशन कृषि दर्शनी आणि रेवती वाणाचे बियाणे एक बॅग देऊन सन्मान केला. फुले रेवती हा ज्वारीचा वाण विकसित करण्यामध्ये डॉ. गडाख यांचा सिंहाचा वाटा आहे.  याप्रसंगी बोलतांना डॉ. गडाख यांनी विद्यापीठ तंत्रज्ञानाचा वापर करुन तसेच नवीन वाण वापरुन यापुढेही सातारा जिल्हयातील शेतकऱ्यांनी पीक स्पर्धेत राज्यातच नव्हे तर देशात नाव लौकिक मिळवावा, असे आवाहन केले. संबंधित शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना कायम मार्गदर्शन करणारे दोन्ही गांवचे कृषि सहाय्यक श्री. भानुदास चोरगे व श्री. मनोज पाटील यांनाही या कार्यक्रमात शेतकऱ्यांशी योग्य समन्वय ठेवुन फुले रेवती वाणाचे प्रात्यक्षिक आयोजित करून ज्वारीचे उत्पादन वाढविण्यासाठी मदत केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरवातीस कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक प्रा. मोहन शिर्के यांनी प्रास्ताविक केले. ज्वारी सुधार प्रकल्पातील ज्वारी पैदासकार, किटकशास्त्रज्ञ, रोगशास्त्र विभागातील तज्ञांनी ज्वारी लागवडीचे सुधारित तंत्रज्ञान तसेच

विकसित वाण यावर मार्गदर्शन केले. याप्रसंगी पुरस्कार प्राप्त सन्मानीत शेतकरी श्री. चिकने व श्री. वरखडे यांनी कृषि विद्यापीठाच्या फुले रेवती या ज्वारी वाणाचे कौतुक करुन या वाणामुळेच स्पर्धेत यशस्वी होणे शक्य झाल्याचे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. महेश बाबर व आभार प्रदर्शन श्री. भुषण यादगीरवार यांनी केले.

## संशोधन संचालकांची कृषि संशोधन केंद्रांना भेटी

**दि. १७ सप्टेंबर, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत अखिल भारतीय समन्वीत मका सुधार प्रकल्प, कसबा बावडा या संशोधन केंद्राने मका संशोधनामध्ये भरीव कामगिरी करुन मक्याच्या उत्कृष्ट वाणाची निर्मिती केलेली आहे. जागतीक पातळीवर मक्याची आफ्रिकन टॉल सारखी चाऱ्यासाठी व स्वीट कॉर्नमध्ये फुले मधु यासारख्या प्रसिध्द वाणाचे संशोधन तसेच मक्यामध्ये विविध संशोधन शिफारशी विकसीत करुन शेतकऱ्याचा आर्थिक स्तर वाढविण्यास मदत केलेली आहे. त्यायोगे आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधन क्षेत्रामध्ये मका सुधार प्रकल्पाचे कार्य भुषणावह असल्याचे प्रतिपादन संशोधन संचालक डॉ. शरद गडाख यांनी केले. अखिल भारतीय समन्वीत मका सुधार प्रकल्प, कसबा बावडा यांच्या अधिनस्त शेंडापार्क येथील मका संशोधन प्रक्षेत्राची पाहणी करतांना ते बोलत होते. मका संशोधन प्रक्षेत्रावर असणाऱ्या मका पैदास, किटकशास्त्र व कृषि विद्या विषयातील विविध संशोधन प्रकल्पाचे प्रयोग भविष्यकाळात निश्चितच शेतकऱ्यांना उपयोगी येतील असेही ते पुढे म्हणाले. तत्पूर्वी डॉ. गडाख यांनी कृषि संशोधन केंद्र, राधानगरी व गडहिंग्लज येथील कृषि संशोधन केंद्राना भेटी दिल्या. याप्रसंगी मका सुधार प्रकल्पातील ५५ अश्वशक्ती असलेल्या नविन ट्रक्टरचे व मशागतीस आवश्यक अवजारांचे पूजन डॉ. गडाख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडापार्क, कोल्हापूर येथील सहयोगी संशोधन संचालक यांच्या दालनात सर्व योजनांचा आढावा घेतला. यावेळी सहयोगी संशोधन संचालक डॉ. उत्तम होले यांनी संशोधन कार्याचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मका पैदासकार डॉ. सुनिल कराड यांनी तर आभार उद्यानविद्या विभागाचे डॉ. सुनिल सावंत यांनी मानले. या कार्यक्रमास डॉ. प्रविण गजभिये, डॉ. शैलेंद्र वाळे, डॉ. सुहास भिंगारदिवे, पशुचिकित्सक डॉ. यादव, डॉ. शैलेश कुंभार, श्री. सुशांत महाडीक, श्री. सुहास साळुंके आदी अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. धनाजी शिरगावे, श्री. सागर शेळके व श्री. धोंडीराम धनवडे यांनी परिश्रम घेतले.

## आंतरराष्ट्रीय पोषक तृणधान्य वर्षानिमित्त कार्यक्रम

**दि. १७ सप्टेंबर, २०२१.** तृणधान्याचे महत्व आदिकालापासून आहे. रोजच्या आहारात तृणधान्याचा समावेश पूर्वी मोठ्या प्रमाणात केला जात होता. त्याच्या पौष्टीक गुणधर्मामुळे शारिरीक कष्ट सहज साध्य होत होते. बदलत्या जीवनशैलीमुळे आपले आरोग्य बिघडले आहे. ज्वारी, बाजरी, नागली यासारख्या तृणधान्यांचे विविध वाण संशोधनामध्ये कृषि विद्यापीठाचा मोठा वाटा आहे. अशा या पौष्टीक गुणधर्म असलेल्या तृणधान्यांचा समावेश आपल्या आहारामध्ये केल्यास आपले आरोग्य अबाधित राहिल. यासाठी सर्वांनी आपल्या आहारात जास्तीत जास्त तृणधान्यांचा समावेश करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी केले. आंतरराष्ट्रीय पोषक तृणधान्य वर्ष–२०२३ अंतर्गत पोषण वाटीका महाभियान आणि वृक्षारोपन कार्यक्रम महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे आयोजीत करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन डॉ. रसाळ बोलत होते. यावेळी या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. बाबुराव बापूजी तनपुरे सहकारी साखर कारखान्याचे संचालक कृषिभूषण श्री. सुरसिंग पवार उपस्थित होते. यावेळी सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. श्रीमंत रणपिसे, हळगाव महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे,






कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आंतरराष्ट्रीय पोषक तृणधान्य वर्ष-२०२३ बद्दल कृषि आणि किसान कल्याण केंद्रिय मंत्री मा. श्री. नरेंद्र सिंह तोमर यांनी ऑनलाईन मार्गदर्शन केले.

कृषिभूषण श्री. सुरसिंग पवार आपल्या मार्गदर्शनात म्हणाले कमी खर्चात अधिक उत्पादन देणारे वाण संशोधित करुन राहुरी कृषि विद्यापीठाने शेतकऱ्यांसाठी महत्वाचे कार्य केलेले आहे. यावेळी अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. उत्तम चव्हाण यांनी पोषक तृणधान्याचे मानवी आहारातील महत्व व राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्पाचे प्रभारी अधिकारी डॉ. बाबासाहेब सिनारे यांनी शाश्वत शेती आणि ग्रामीण जीवनामध्ये वृक्षांचे महत्व या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते वृक्षांचे वृक्षारोपन करुन उपस्थित शेतकऱ्यांना वृक्षांचे तसेच फुले बियाण्याचे वाटप करण्यात आले. स्वागत व प्रास्ताविक कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक डॉ. दत्तात्रय पाचारणे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सचिन सदाफळ यांनी तर आभार डॉ. गोकुळ वामन यांनी मानले. कार्यक्रमासाठी विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख, अधिकारी, परिसरातील शेतकरी व विद्यार्थीनी उपस्थित होते.

## राहुरी कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञ व विद्यार्थ्यांची रावळगाव येथील पवार बंधुंच्या प्रक्षेत्रास भेट





**दि. २१ सप्टेंबर, २०२१.** राष्ट्रीय उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परीषद यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये कार्यरत असून या प्रकल्पाअतर्गत आधुनिक शेती तंत्रज्ञान पध्दतीचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रास महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी येथील शास्त्रज्ञ आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी भेट दिली. या अभ्यास दौऱ्याचे आयोजन प्रमुख संशोधक डॉ. सुनिल गोरंटीवार, सहसंशोधक डॉ.मुकुंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या प्रकल्पाअंतर्गत आधुनिक

शेती तंत्रज्ञान पध्दतीचा अभ्यास करण्याकरीता एक दिवसीय अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या अनुषंगाने नाशिक जिल्हयातील मालेगाव तालुक्यातील रावळगांव येथील प्रगतशील शेतकरी श्री. रवी पवार यांच्या प्रयोगशील शेतीस संबंधीतांनी भेट दिली. त्यांनी एकूण ८६ एकर प्रक्षेत्रावर आधुनिक तंत्रज्ञान शेती पध्दतीचा वापर करुन डाळिंब आणि शेवगा पिकांची लागवड केलेली आहे. यामध्ये प्रामुख्याने यांत्रिकीकरणावर भर दिला आहे, त्यामुळे शेतमजुरावरील खर्चाची बचत होते. यामध्ये मातीतील ओलावा मोजण्यासाठी सेन्सर, प्रकाशमापक, स्लरी युनिट, स्वयंचलित भरणी यंत्र, ठिंबक सिंचन पध्दती जमिनीपासून २.५ फूट उंचावर बसविण्यात आलेली आहे, इत्यादी आधुनिक शेती पध्दतीचा वापर करुन डाळिंब आणि शेवगा पिकाचे उच्च / विक्रमी उत्पादन घेतात.


यावेळी शास्त्रज्ञ व सर्व विद्यार्थ्यांनी श्री. महेश पवार यांच्या शेवगा शेतीस भेट दिली. त्यांच्याकडून शेवगा उत्पादन तंत्रज्ञान पैलुंची माहिती घेण्यात आली. यात प्रामुख्याने, शेवगा बियाणे निवड, खत व्यवस्थापन, लागवड अंतर, वाण व स्वत: बनवत असलेल्या गांडुळ खताचा वापर या विषयी सखोल चर्चा करण्यात आली. शेवगा उत्पादनामध्ये बहार व्यवस्थापन ही महत्वाची बाब असल्याचे श्री. पवार यांनी मत व्यक्त केले. या सर्व आधुनिक शेती पध्दतीचा विद्यार्थ्यांना फायदा होईल. तसेच सर्व शास्त्रज्ञ व विद्यार्थीनी कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, काष्टी, मालेगाव येथे भेट दिली. या भेटीदरम्यान डॉ. मुकुंद शिंदे, सहसंशोधक, कास्ट प्रकल्प यांनी कास्ट प्रकल्पाबद्दल तसेच डिजीटल ॲग्रीक्लचर बद्दल त्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या अभ्यास दौऱ्यात काष्टी महाविद्यालयाचे नोडल अधिकारी डॉ. विश्वनाथ शिंदे, एकूण १५ शास्त्रज्ञ, व पदव्युत्तर महाविद्यालय राहुरीचे १९ तसेच कृषि व्यवसाय आणि व्यवस्थापन काष्टी महाविद्यालयाचे १८ विद्यार्थी सहभागी झाले होते.

## संशोधन संचालक डॉ. शरद गडाख यांच्या विविध कृषि संशोधन केंद्र आणि प्रकल्पांना भेटी

**दि. २१ सप्टेंबर, २०२१.** कृषि महाविद्यालय, पुणे व विभागीय कृषि संशोधन केंद्र, गणेशखिंड, पुणे या पुणे शहरातील दोन्ही संस्था महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कार्यरत आहेत. या दोन्ही संस्थांना विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. शरद गडाख यांनी भेट देवून संशोधन कार्याचा आढावा घेतला. यावेळी डॉ. गडाख यांनी संर्व प्रथम सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी व अंजिर संशोधन केंद्र, पुरंदर येथे भेट देवून तेथील संशोधन केंद्राची पहाणी केली. त्यानंतर कृषि महाविद्यालयातील भेटी दरम्यान जैविक नत्र स्थिरीकरण योजना व जैविक खत निर्मिती प्रकल्प, अळिंबी संशोधन प्रकल्प, जैविक किड नियंत्रण प्रयोगशाळा आणि बाजरीवरील अरगट रोग नियंत्रण संशोधन प्रकल्प या संशोधन प्रकल्पांना भेट देवून सुरु असलेल्या संशोधन प्रयोगाची, कार्याची आणि विस्तार प्रयत्नांची माहिती घेतली. अपुऱ्या मनुष्यबळामुळे देखील सर्व शास्त्रज्ञ संशोधनाचे कार्य प्रयत्नपुर्वक करत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. या भेटीदरम्यान सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य डॉ. सुनिल मासाळकर, गणेशखिंडचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. विनय सुपे, इतर शास्त्रज्ञ व कर्मचारी उपस्थित होते.

मफुकृवि ई वार्ता
सप्टेंबर २०२१

## राष्ट्रीय सेवा योजनेचा ५२ वा वर्धापन दिन साजरा




**दि. २५ सप्टेंबर, २०२१.** समाजसेवेचे बाळकडू राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळते. यामुळे स्वयंसेवकांमध्ये निस्वार्थीपणाची भावना महाविद्यालयीन स्तरावर निर्माण होते व त्यामुळे आयुष्यात त्या विद्यार्थ्यांचा व समाजाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते असे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषी महाविद्यालय, हाळगाव या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचा ५२ वा वर्धापन दिन ऑनलाइन पद्धतीने साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना डॉ. रसाळ बोलत होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीरसिंग चव्हाण उपस्थित होते. यावेळी सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेचा हेतू नॉट मी बट यू समजावून सांगितला. यावेळी डॉ. अहिरे आपल्या मार्गदर्शनात बोलताना म्हणाले की विद्यार्थ्यांनी समाजाच्या विकासासाठी कष्ट करण्याची सामाजिक बांधिलकी ठेवली पाहिजे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सखेचंद अनारसे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाची प्रस्तावना राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. कीर्ती भांगरे यांनी केली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या महेश जाधव, मंजिरी पाटील व संचीता नवले या स्वयंसेवकांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. वैशाली पोंदे यांनी तर आभार सौ. अंजली देशपांडे यांनी मानले. या कार्यक्रमाला डॉ. चारुदत्त चौधरी, डॉ. मनोज गूड, डॉ. प्रेरणा भोसले, सौ. सासवडे, श्री. अमृता सोनवणे व १०० पेक्षा जास्त विद्यार्थी ऑनलाईन उपस्थित होते.

## पुणे कृषि महाविद्यालयात भारतीय युवकांना जपानमधील संधी यावर वेबीनार संपन्न

**दि. २५ सप्टेंबर, २०२१.** कृषि महाविद्यालय, पुणे येथे श्री. टोमीओ इसोगाई, कोच्चर आणि कंपनीचे भारत–जपान संबंधाविषयीचे मुक्त वरीष्ठ सल्लागार यांचे भारतातील युवकांना जपानमधील संधी या विषयीचा वेबीनार आयोजीत करण्यात आला होता. यावेळी श्री. इसोगाई यांनी जपानने साध्य केलेल्या प्रगतीचे इस्पीत सांगत भारत व जपान धोरणात्मक साथीदार होऊन संपूर्ण जगाला नविन दिशा कसे दाखवू शकतात या विषयी मार्गदर्शन केले. त्यांनी भारत व जपानमधील

समानता अधोरेखीत करत जपानला आवश्यक असणाऱ्या युवक शक्तीचा भारतीय युवक कसा फायदा घेवू शकतात हे विस्तृतपणे सांगितले. सदरील वेबीनारकरीता महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनिल मासाळकर, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. प्रमोद पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने ऑनलाईन उपस्थित होते.

## पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती साजरी



**दि. २७ सप्टेंबर, २०२१.** महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथील पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर कृषी महाविद्यालय, हाळगाव या महाविद्यालयात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे उपस्थित होते. डॉ. मिलिंद अहिरे यांच्या शुभहस्ते पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. जयंतीच्या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सखेचंद अनारसे डॉ. मनोज गुड, डॉ. प्रेरणा भोसले, प्रा. कीर्ती भांगरे, सौ.अंजली देशपांडे सौ. वैशाली पोंदे,सौ.सासवडे व श्री अमृत सोनवणे उपस्थित होते.


## हॉर्टसॅप प्रकल्पांतर्गत महात्मा फुले कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या डाळिंब बागांना भेटी व मार्गदर्शन



**दि. २३ सप्टेंबर, २०२१.** महाराष्ट्र शासनाच्या फलोत्पादन पिकावरील किड रोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प (हॉर्टसॅप) अंतर्गत, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील वनस्पती रोगशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक तथा

हॉर्टसॅप समन्वयक डॉ. संजय कोळसे व संशोधन सहयोगी डॉ. नंदलाल देशमुख समवेत महाराष्ट्र शासनाच्या अहमदनगर जिल्हयातील कृषि विभागाचे अधिकारी यांनी अहमदनगर, राहुरी व श्रीरामपूर तालुक्यातील किडी व रोग आर्थिक नुकसान पातळीच्या वर गेलेल्या गांवामधील डाळिंब बागांना भेटी दिल्या. रोग व किडी आर्थिक नुकसान पातळीच्यावर गेलेल्या अहमदनगर तालुक्यातील नेप्ती, राहुरी तालुक्यातील वांबोरी, मोकळओव्हळ, गुहा, तांभेरे व श्रीरामपुर तालुक्यातील पढेगाव, वळदगाव, बेलापूर बुद्रक या गावांमधील कृषि विभागाचे प्रक्षेत्र अधिकारी यांच्या समवेत हॉर्टसॅप योजनेअंतर्गत डाळिंबाच्या निवडलेल्या प्लॉटला भेटी दिल्या. अनेक गांवातील डाळिंब प्लॉटच्या पाहाणीदरम्यान असे निदर्शनास आले की, काही बागांची फळे तोडणी सुरु आहे, तसेच काही बागांची तोडणी पुर्ण झालेली आहे. यामध्ये बऱ्याच बागांमध्ये मर रोग, फळांवरील ठिपके, तेल्या रोग तसेच फुलकिडे व फळ पोखरण्याऱ्या अळीचा प्रादुर्भाव झालेला आहे. पहाणी दरम्यान असेही निदर्शनास आले की लागवडीतील अंतर खुप कमी असलेल्या बागांमध्ये रोग व किडींचा प्रादुर्भाव जास्त दिसून आला. यामध्ये काही बागा पुर्ण:त तणाने व्यापलेल्या तसेच काही बागांची फळ तोडणी पुर्ण झाल्यानंतर किड व रोगग्रस्त, नाशवंत फळे व फांदया तश्याच बागेत पडलेल्या दिसून आल्या. त्याबाबतील शेतकऱ्यांना रोगट फळे, फांद्या नष्ट करणे, तणविहरित बाग ठेवणे इ. बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या सर्वेक्षण व मार्गदर्शन मोहिमेमध्ये अति प्रादुर्भाव झालेल्या बागांची पाहाणी करुन शास्त्रज्ञांनी डाळिंब बागेमध्ये प्रादुर्भाव झालेल्या किड व रोगाच्या एकात्मिक व्यवस्थापणासाठी सविस्तर मार्गर्शन करुन शेतकऱ्यांच्या शंकाचे निरसण देखील केले. सदर मोहिम ही महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या वनस्पती रोगशास्त्र विभाग प्रमुख डॉ. तानाजी नरुटे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयामध्ये शिक्षक दिन साजरा





**दि. ६ सप्टेंबर, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयात शिक्षक दिन ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणुन प्रा. सौ. अनुपमा बागल देवकर, ता. करमाळा, जि. सोलापूर या होत्या. हा कार्यक्रम सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करतांना प्रा. सौ. बागल देवकर म्हणाल्या की विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील परस्पर संबंध विद्यार्थ्यांचे भावी आयुष्य घडविण्याच्या दृष्टीने खुप महत्वाचे असतात. विद्यार्थ्याने शिक्षणाचा खरा अर्थ काय आहे हे समजून घेतले पाहिजे. आपल्या शिक्षणाचा वापर स्वतः बरोबरच समाजाच्या कल्याणासाठी केला पाहिजे. यावेळी डॉ. अहिरे आपल्या भाषणात म्हणाले की विद्यार्थी–शिक्षक यांच्यामधील संबंध फार महत्वाचे असून शिक्षक वेळोवेळी समजावून सांगण्याचा प्रयत्न करतात तसेच ते कधी कधी रागवतात. यामागे आपला विद्यार्थी चांगल्या पध्दतीने घडावा हाच उदेद्श असतो. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सखेचंद अनारसे यांनी केले. सूत्रसंचालन सौ. वैशाली पोंदे यांनी तर आभार सौ. अंजली देशपांडे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी शिक्षक व विद्यार्थी ऑनलाईन पध्दतीने उपस्थित होते.

मफुकृवि ई वार्ता
सप्टेंबर २०२१

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयात क्रांतिकारक उमाजी नाईक यांना अभिवादन




**दि. ८ सप्टेंबर, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयात आद्यक्रांतीकारक तसेच थोर स्वातंत्र्य सेनानी राजे उमाजी नाईक यांच्या १८८ जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे व विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीरसिंग चौहान यांनी उमाजी नाईक यांच्या प्रतिमेचे पुजन करून त्यांना विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी डॉ. अहिरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. चौहान यांनी उमाजी नाईक यांच्याविषयी माहिती देवून उपस्थितांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सखेचंद अनारसे यांनी आभार मानले. या कार्यक्रमास डॉ. चारूदत्त चौधरी, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. किर्ती भांगरे, डॉ. प्रेरणा भोसले, डॉ. मनोज गुड, सहाय्यक अधिक्षक श्री. शेळके व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## शेतकरी-शास्त्रज्ञ बैठकीचे आयोजन





**दि. ३ सप्टेंबर, २०२१.** कृषि विद्यापीठाने प्रसारीत केलेल्या सुधारीत वाणांचा, शिफारशींचा व सुधारीत तंत्रज्ञानाचा वापर करुन तुरीची लागवड, व्यवस्थापन व जोपासना केली तर तुरीसारख्या पिकाचे सुध्दा एकरी १४ क्विंटलपर्यंत उत्पन्न घेणे शक्य आहे असे प्रतिपादन कडधान्य सुधार प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार कुटे यांनी केले. शिराळ व शिंगवे केशव ता. पाथर्डी येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत केलेल्या शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाची बैठक व शेतकऱ्यांची शेतीशाळा या संयुक्त कार्यक्रमात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. तुर किटकशास्त्रज्ञ डॉ. चांगदेव वायाळ यांनी पीक संरक्षणबाबत मार्गदर्शन केले. रोगशास्त्रज्ञ डॉ. विश्वास

चव्हाण यांनी रोगनियंत्रणाबाबत माहिती दिली. कृषि पर्यवेक्षक बाळासाहेब काकडे यांनी कृषि विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या शेतीशाळेची शेतकऱ्यांना सविस्तर माहिती दिली.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयात प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती साजरी



**दि. २० सप्टेंबर, २०२१.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषी महाविद्यालय, हाळगाव या महाविद्यालयात प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला राहुरी सहकारी साखर कारखान्याचे संचालक व कृषिभूषण श्री. सुरसिंग पवार हे उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रबोधनकार ठाकरे यांना विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी त्यांनी प्रबोधनकार ठाकरे यांनी समाजातील अनिष्ठ रूढी व परंपरा यांचा समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीने काय अनिष्ट परिणाम होतो व त्यावर काय उपाययोजना केल्या याविषयी सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे डॉ. मनोज गुड, डॉ. आनंद चवई, प्रा. किर्ती भांगरे, सौ. अंजली देशपांडे सौ. वैशाली पोंदे, सौ. सासवडे, श्री. अमृत सोनवणे व इतर कर्मचारी उपस्थित होते. डॉ. सखेचंद अनारसे यांनी आभार मानले.

## ऑक्टोबर महिन्यातील कामांचा तपशील

### बागायती कापूस

- पिकातील २० ते ३० टक्के बोंडे फुटल्यानंतर पहिली वेचणी करून घ्यावी. त्यानंतर १५ ते २० दिवसांच्या अंतराने अनुक्रमे दुसरी व तिसरी वेचणी करावी.
- कापूस वेचणी आटोपल्यानंतर सर्व पऱ्हाट्या उपटून शेताबाहेर न्याव्यात व त्याचा कंपोस्ट खत तयार करण्यासाठी वापर करावा. जेणेकरून किडींच्या अवस्था नष्ट होतील.

### ऊस

- आडसाली उसाच्या लागणीस को.८६०३२ या जातीसाठी शिफारशीत (५००:२००:२०० किलो नत्र, स्फुरद व पालाश प्रति हेक्टरी) खतमात्रेच्या १० टक्के नत्र ५० किलो प्रति हेक्टरी खताची तिसरी मात्रा (१२ ते १६ आठवडे वयाच्या उसासाठी) देण्यासाठी युरीया ११० किलो प्रति हेक्टरी वापरावा व इतर जातीच्या उसाकरीता प्रति हेक्टरी ४० किलो नत्र खतांचा तिसरा हप्ता (८७ किलो युरिया) लागणीनंतर १२ ते १६ आठवडयांनी द्यावा. नत्र खताची मात्रा देण्यासाठी निमकोटेड युरीयाचा वापर करावा.
- आडसाली उसाच्या लागणीस ६० दिवसांनी प्रतिहेक्टरी ५ लिटर मल्टीमॅक्रोन्युट्रीयंट (नत्र ८%, स्फुरद ८% व पालश ८%)व मल्टीमायक्रोन्युंट्रीयंट (ग्रेड–२) या द्रवरूप खतांची प्रत्येकी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी उसाच्या लागणीस ९० दिवस झाले असल्यास प्रतिहेक्टरी ७.५ लिटर मल्टीमॅक्रोन्युट्रीयंट व मल्टीमायक्रोन्युटीयंटची प्रत्येकी ७५० लिटर पाण्यातून फवारणी करावी.
- आडसाली उसाला ॲसेटोबॅक्टर जिवाणू संवर्धकाची बिजप्रक्रीया लागणीचे वेळी केलेली नसल्यास ६० दिवसांनी १ लिटर द्रवरूप ॲसेटोबॅक्टर जिवाणू संवर्धकाची २०० लिटर पाण्यात मिसळून हेक्टरी फवारणी करावी.
- पूर्वहंगामी उसाच्या लागवडीसाठी पूर्वतयारी करा, पूर्वहंगामी उसाची लागण १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीत पूर्ण करा.
- लागणीसाठी को.८६०३२, को.एम. ०२६५, फुले १०००१, को.एम.१२०८५ (फुले ९०५७), व्ही. एस.आय.१२१२१ आणि व्ही.एस.आय. ४३४ या जातींची निवड करा.
- लागणीच्या वेळी प्रति हेक्टरी ४० किलो नत्र (८७ किलो युरिया) को.८६०३२ जातीसाठी व इतर सर्व जातींसाठी ३४ किलो नत्र (७४ किलो युरिया) तसेच ८५ किलो स्फुरद (५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि ८५ किलो पालाश (१४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) ही रासायनिक खते सरीमध्ये द्यावीत.

### हरभरा व्यवस्थापन

- २० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर पर्यंत बागायती हरभरा बीजप्रकिया करुन पेरावा.
- पेरणीनंतर लगेच पुरेसा ओलावा असताना उगवणीपूर्व तणनाशक पेंडिमेथॉलीन फवारावे.
- किडनियंत्रणासाठी एकात्मिक किड नियंत्रण पध्दतीचा अवलंब करावा. यामध्ये सापळा पीक, कामगंध सापळे, पक्षी थांबे याचा अवलंब करावा.

### तूर

- पिकाच्या शेंगा भरण्याच्या अवस्थेत किडी पासून संरक्षणासाठी हेलिकोकिल (५०० मिली / ५०० लि. पाणी ) या

जैविक किटकनाशकाची दुसरी फवारणी करावी व आवश्यकता असेल तर तिसरी फवारणी १८.५ % एस सी क्लोरअन्ट्रीनिलोप्रोल १५० मिली अथवा इमामेक्टीन झोएट ५०% एस. जी. २०० ग्रॅम अथवा फल्युबेंडामाईड ४५ % एस. सी. १५० मिली/ ५०० लि. पाणी या किटकनाशकाची करावी.

- शेंगा भरण्याच्या अवस्थेत पाऊस नसल्यास पिकास संरक्षित पाणी दयावे किंवा २ टक्के युरियाची फवारणी करावी.

### नाचणी पीक

- नाचणी पीक पावसाच्या पाण्यावर घेतले जाते. पावसामध्ये खंड पडल्यास उपलब्धतेनुसार संरक्षित पाणी द्यावे.
- भेसळ काढणे.

### रब्बी ज्वारी

- पहिला पंधरवडा – पेरणीनंतर १५ दिवसांनी विरळणी करून एका ठिकाणी एक रोप ठेवावे व पेरणीनंतर ३ आठवड्यांने फटीच्या कोळप्याने पहिली कोळपणी करावी.
- दुसरा पंधरवडा – खोडकिडा नियंत्रण– खोडकिडा प्रादुर्भाव दिसल्यास क्युनॉलफॉस २५ ईसी ७५० मीली प्रवाही ५०० लीटर पाणी प्रती हेक्टरी फवारणी करावी. आवश्यकतेनुसार पहिली खुरपणी करावी. पेरणीनंतर ५ आठवड्याने पासेच्या कोळप्याने दुसरी कोळपणी करावी आणि गरज असल्यास पहिले संरक्षित पाणी द्यावे.

### गहू

- गव्हासाठी भारी व खोल जमीन निवडून पूर्व मशागत करणे.
- बागायती पेरणीसाठी फुले समाधान, तपोवन, त्र्यंबक, गोदावरी या जातीमधून हेक्टरसाठी १२० किलो बियाणे घेणे.
- जिरायती पेरणीसाठी पंचवटी किंवा नेत्रावती या वाणाचे हेक्टरी १०० किलो बियाणे घेणे.

### फळबाग व्यवस्थापन

- डाळिंब – पक्व फळांची काढणी करणे व खतांची हलकी मात्रा देऊन बाग ताणावर सोडावी.
- सिताफळ – गरज असल्यास पाणी व्यवस्थापन करून पिकलेली फळे काढावीत.
- बोर – गरज असल्यास पाणी व रोग किडींचे नियंत्रण करावे.
- आवळा – पक्व झालेली फळे काढण्यात सुरवात करावी.
- अंजीर – खतांचे नियोजन करणे व मिठा बहार धरणेसाठी पाण्याचे नियोजन करावे.
- जांभूळ– बाग ताणावर सोडावी.
- कागदी लिंबू – हस्त बहाराचे नियोजनासाठी १ टक्का पोटॅशियम नायट्रेटची फवारणी करावी.
- मोसंबी : आंबे बहाराच्या फळांची काढणी करावी.

### भाजीपाला व्यवस्थापन

- रांगडा कांदा लागवड पहिल्या आठवड्यात पूर्ण करावी.
- खरीप कांदा लागवडीस नत्र खताचा दुसरा हप्ता द्यावा.
- खरीप हंगामातील वांगी, मिरची, टोमॅटो काढणी करावी.

- कोबी व फ्लॉवर पिकाची काढणी करावी.
- वेलवर्गीय भाजीपाला पिकाची काढणी करावी.
- भेंडी व गवार पिकाची काढणी करावी.
- सर्व खरीप भाजीपाला पिकांवरील किड व रोगाचे नियंत्रणाचे उपाय करावेत.
- दुसऱ्या पंधरवड्यापासून लसूण लागवडीस सुरूवात करावी.
- रब्बी हंगामातील कांदा पिकासाठी रोपवाटीका तयार करावी.
- कांदा बियाण्याची पेरणी करावी.
- रब्बी हंगामातील टोमॅटो, फ्लॉवर, कोबी पिकाची रोपवाटीका करावी.
- वाटाणा पिकाची लागवड दुसऱ्या पंधरवड्यापासून करावी.
- रब्बी हंगामामध्ये येणाऱ्या गाजर, मुळा, बिट पिकाची लागवड करावी.

## आले

- खोड पोखरणारी अळीचे नियंत्रण करावे. ही किड मुख्यत: जुलै ते ऑक्टोबर या काळामध्ये आढळते. या किडीची अळी छोटया खोडाला छिद्र करते आणि त्यावर उपजिविका करते. त्यामुळे खोड पिवळे पडून वाळण्यास सुरुवात होते. अळीने पाडलेल्या छिद्रावर जाळीदार भाग दिसतो. या किडीच्या नियंत्रणासाठी एक महिन्याच्या अंतराने निमतेल १ टक्के फवारणी करावी.
- सुत्रकृमी : काही भागामध्ये या पिकावर सुत्रकृमीचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. पिकाच्या मुळाभोवती राहून सुईसारख्या अवयवाने मुळातील रस शोषण करतात. त्यामुळे पिकाची वाढ खुंटते व पाने पिवळी पडतात. तसेच यांनी केलेल्या छिद्रातून कंदकुजीस कारणीभूत असलेल्या बुरशींचा सहज शिरकाव होतो. सुत्रकृमीच्या नियंत्रणासाठी लागवडीच्या वेळी ट्रायकोड्र्मा प्लस ५ किलो या प्रमाणात द्यावे. किंवा १८ ते २० क्विं/हे.निंबोळी पेंडीचा वापर करावा. ट्रायकोडर्मा वापरतांना ७ ते १० दिवस सेंद्रीय पदार्थात मुरवुनच जमिनीत घालावे व माती आड करावे.
- हुमणी नियंत्रणासाठी मेटाऱ्हाझीयम या जैविक किडनाशकाचा वापर करावा तसेच भुंगेरे आकर्षित करण्यासाठी एरंड आंबवण सापळयाचा वापर करावा.

## काढणी आणि उत्पादन

- आले पीक ७५ टक्के परिपक्व झालेनंतर काढणी केली तरी मार्केटला विक्रीसाठी चालते.
- हिरवे आले म्हणून वापरावयाचे असल्यास पिकाची काढणी ६ महिन्यांनी करवी.

## पशुसंवर्धन

- या महिन्याच्या दुसऱ्या आठवडयात आंतरकृमी व बाह्य परोपजीवींचा नायनाट करण्यासाठी बहुप्रभावी जंतनाशक औषध पशुवैद्यकाच्या सहाय्याने दयावे.
- उर्जा व प्रथितेयुक्त पशु आहाराचा समावेश करुन पशु आहार वाढवावा.
- थंडीची सुरुवात होवून श्वसनाचे आजार संभावण्याची शक्यता असते त्यामुळे विशेषत: लहान वासरांची काळजी घ्यावी.

## अवजारे

ट्रॅक्टरचलित फुले हायड्रो–मेकॅनिकली नियंत्रित फळबागेतील दोन झाडांच्यामधील तण काढणी यंत्र

- रोटरी युनिट दोन झाडांच्या मध्ये व बाहेर हायड्रो–मेकॅनिकयंत्रणेद्वारे सहजपणे कार्य करते.
- फ्रेमच्या योग्य मांडणीमुळे ट्रॅक्टर चालकास यंत्र व्यवस्थित दिसते.
- दोन झाडांच्या मधल्या जागेतील किंवा दोन झाडांच्या ओळीमधील तण काढण्यासाठी उपयुक्त.

## शेतकऱ्यांसाठी शासकीय योजना

- भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना : या योजनेअंतर्गत एकूण १६ बहूवर्षजीवी फळपिकांचा समावेश करण्यात आला असून नारळ,सिताफळ व लिंबू रोपे वगळता उर्वरीत फळपिकांची कलमाद्वारे लागवड करण्यास मान्यता आहे. सदर योजनेअंतर्गत फळबाग लागवडीकरीता ठिबक सिंचन बसविणे तसेच कागदी लिंबू, संत्री व मोसंबी या लिंबूवर्गीय फळपीकांच्या लागवडीकरीता माती परिक्षण करणे अनिवार्य आहे.
- मुख्यमंत्री कृषि आणि अन्नप्रक्रिया : सन २०१७ पासून मुख्यमंत्री कृषि आणि अन्नप्रक्रिया योजना राबविण्यात येत आहे.
- प्रधानमंत्री किसान सन्मान निधी : देशातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी कुटुंबियांच्या उत्पन्नास जोड देण्यासाठी हि केंद्रिय क्षेत्रातील योजना सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत संबधित राज्यातील भूमी अभिलेखानुसार दोन हेक्टर लागवडीयोग्य एकत्रितरित्या स्वतःची जमीन असणारी कुटुंबे (पती–पत्नी व त्यांचे १८ वर्षावरील अपत्य मिळून) पात्र आहेत. कृषि गणना २०१५–१६ च्या प्रक्षेपणाच्या आधारे सन २०१८–१९ मधील लाभार्थी निश्चित केले आहेत. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना दर वर्षी रू.६,०००/– आर्थिक लाभ प्रत्येकी ४ महिन्याच्या तीन समान हप्त्यात अनुज्ञेय असेल. लाभार्थ्यांच्या निश्चितीकरणानंतर तात्काळ रू. २,०००/–पहिला हप्ता अदा करण्यात येत आहे.
- गटशेतीचे सबलीकरण व प्रोत्साहन योजना : सन २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दृष्टीने सहाय्य होण्यासाठी शासनाने राज्यात गटशेतीचे सबलीकरण व प्रोत्साहन योजना सुरू केली आहे. ही योजना सर्वसाधारण किमान २० शेतकरी व १०० एकर क्षेत्र, कोकण विभागासाठी ५० एकर क्षेत्र असलेल्या गटांना अनुज्ञेय आहे. या योजनेअंतर्गत आर्थिक मर्यादा प्रति गट रू. १ कोटी असुन कोकणाकरिता प्रति एकर रू.१ लाख आहे. ही योजना सन २०१७–१८ व सन २०१८–१९ या आर्थिक वर्षात पथदर्शी प्रकल्प म्हणून जाहीर करण्यात आली आहे.

**प्रकाशक** : डॉ. शरद गडाख
संचालक, विस्तार शिक्षण

**प्रमुख संपादक** : डॉ. पंडित खर्डे
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र

**सहसंपादक** : डॉ. सचिन सदाफळ
सहाय्यक प्राध्यापक, प्रसारण केंद्र
श्री. सुनिल राजमाने
कृषि सहाय्यक, प्रसारण केंद्र

**डिझाईनर** : श्री. सिध्दार्थ साळवे
प्रसारण केंद्र

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २४०७/२०२१